-३- नि.४४

रे.दि.मु.नं. ६४/२०२५

# कणकवली येथील मे. दिवाणी न्यायाधीश क-स्तर यांचे कोर्टात

**बाबुराव दत्ताराम गुरव उर्फ गावकर** **- वादी**

**विरुद्ध**

**प्रमोद तुकाराम गुरव वगैरे .** **– प्रतिवादी**

**प्रतिवादी क्रं.१ व ३ तर्फे तूर्तातूर्त ताकीद अर्जावर म्हणणे असे की,**

१ ) वादीचा तूर्तातूर्त ताकीद अर्ज खोटा व खोडसाळ आहे. या म्हणण्यात पुढे उघडपणे मान्य केल्या मजकुराशिवायचा सर्व मजकूर वादीने ताकीद अर्ज चौकशी कामी शाबित करावयाचा आहे.

२ ) वादीने ताकीद अर्जाच्या पहिल्या परिच्छेदात नमूद केलेला ग्रामपंचायत घर नंबर वगळता केलेले मिळकतीचे वर्णन अत्यंत अपुरे तसेच चुकीचे व धादांत खोटे आहे. त्या परिच्छेदातील सर्व मजकूर प्रतिवादी क्रं. १ हिस मान्य व कबूल नाही.

३ ) वादीने ताकीद अर्जाच्या परिच्छेद क्रं. २ मध्ये नमूद केलेली वंशावळ अपूर्ण व चुकीची आहे. ही वंशावळ जशी नमूद आहे तशी प्रतिवादी क्रं. १ व ३ यांना मान्य व कबूल नाही.

४ ) वादीने ताकीद अर्जाच्या परिच्छेद क्रं. ३ मध्ये नमूद केलेला मजकूर पाहता वादीला प्रतिवादी क्रं. १ ते ३ विरुद्ध ताकीद मागण्याचा कोणताही अधिकार नाही.

५ ) वादीने ताकीद अर्जाच्या चौथ्या परिच्छेदात नमूद केलेला ," वादी व प्रतिवादी यांच्या पूर्वजांनी ---- इथपासून --------भाग समजावयाचा आहे," इथपर्यंतचा सर्व मजकूर चुकीचा ,खोटा व विपर्यस्त व मे. कोर्टाची दिशाभूल करू पाहणारा आहे. वादीने दाव्यासोबत जोडलेला परिशिष्ठ अ म्हणून जोडलेला नकाशा खोटा व चुकीचा आहे. या नकाशाप्रमाणे वस्तुस्थिती जागेवर नाही. तसेच वंशावळीलाही अ परिशिष्ठ म्हणून समाविष्ट केले आहे.

प्रत मिळाली.



Scanned with OKEN Scanner

६ ) वादीने ताकीद अर्जाच्या पाचव्या परिच्छेदात नमूद केलेला ," सदर बर नमूद ----
---या वाक्यापासून --------- कळविलेले होते," इथपर्यंतचा सर्व मजकूर धांदांत खोटा व खोडसाळ तसेच मे. कोर्टाची दिशाभूल करण्यासाठी मुद्दाम तयार केलेला मजकूर आहे. हा मजकूर व त्यात केलेले आरोप प्रतिवादी क्रं.१ ते ३ यांना मान्य व कबूल नाहीत.

७ ) वादीने ताकीद अर्जाच्या सहाव्या परिच्छेदात नमूद केलेला ," वादी नंबर १ ने ---
- या वाक्यापासून------------केलेली आहे", या वाक्यापर्यंतचा सर्व मजकूर धादांत खोटा ,खोडसाळ व मे. कोर्टाची दिशाभूल करू पाहणारा आहे. हा सर्व मजकूर प्रतिवादी क्रं.१ ते ३ यांना मान्य व कबूल नाही.

८ ) वादीने ताकीद अर्जाच्या सातव्या परिच्छेदात नमूद केलेला ,"प्रतिवादी नंबर १ ते ३ यांनी --------- या वाक्यापासून-------------- दावा दाखल करणे भाग पडले आहे ", हा सर्व मजकूर धादांत खोटा, खोडसाळ असून तो प्रतिवादी क्रं.१ ते ३ यांना मान्य व कबूल नाही.

९ ) वादीने ताकीद अर्जाच्या आठव्या परिच्छेदात नमूद केलेला ," वादी हे ----------
---इथपासून -------------------------दिसून येणारे आहे", हा मजकूर मे.कोर्टाची दिशाभूल करून सहानभूती मिळवण्यासाठी तयार केलेला खोटा व खोडसाळ मजकूर आहे. हा मजकूर प्रतिवादी क्रं.१ ते ३ यांना मान्य व कबूल नाही.

१० ) वादीने ताकीद अर्जाच्या परिच्छेद क्रं. नऊ मध्ये नमूद केलेला ," प्रस्तुत दावा ---------------इथपासून ------------अतोनात नुकसान होणारे आहे," हा सर्व मजकूर कांगावा करणारा , खोडसाळ व खोटा मजकूर आहे. हा मजकूर प्रतिवादी क्रं.१ ते ३ यांना मान्य व कबूल नाही.

११ ) वादीने ताकीद अर्जाच्या दहाव्या परिच्छेदामध्ये मागितलेली कोणतीही दाद कायद्याने वादीला कधीही मिळणारी नाही.

१२ ) दावा मिळकतीचे / इमल्याचे वाटप झाल्याचे वादीचेच प्रतिपादन आहे. त्यामुळे प्रतिवादीना शासकीय योजनांचे लाभ देण्यात येवू नये अशी हरकत घेण्याचा कायद्याने अधिकारच वादीला नाही. तरीही तशी हरकत घेणारी नोटीस पाठवल्याचे वादीचे

-



Scanned with OKEN Scanner

प्रतिपादन आहे. या वर्तनक्रमामुळे वादी हा धूर्त पैसेवाला आसामी असल्याचे सिद्ध होते. गरीब प्रतिवादींना त्रास देणे व त्यांचे नुकसान करण्यासाठी द्वेष भावनेने हा अर्ज व दावा केल्याचे उघड होते.

१३) प्रतिवादी क्रं. २ ही ७१ वर्षाची वृद्ध महिला तिच्या मालकीच्या इमल्यात रहाते. प्रतिवादी क्रं. २ चे घर जीर्ण व जुने आहे. भिंती मातीच्या आहेत. छप्पर मोडकळीला आले आहे. अतिवृष्टी व वादळवाऱ्यात प्रतिवादी क्रं. २ हिच्या घराचे नुकसान झाले. जीर्ण भिंत कोसळली. सरकारी निर्देशानुसार तलाठी यांनी या अतिवृष्टीग्रस्त असलेल्या प्रतिवादी क्रं. २ च्या घराच्या नुकसानीची पंचयादी केली. सुमारे दोन लाखाचे नुकसान झाल्याचे त्यात उघड झाले.

१४) प्रतिवादी क्रं. २ वृद्ध व गरीब आहे. प्रतिवादी क्रं. २ ही वादीसारखी श्रीमंत नाही. त्यामुळे पंतप्रधान आवास योजनेतील निकष व नियमानुसार प्रतिवादीला अनुदान मिळाले व या अनुदानातून रहात्या एकमेव ढासळलेल्या घराची दुरुस्ती प्रतिवादी क्रं. २ हिने केली. व तो प्रतिवादी क्रं. २ हिचा हक्क आहे. या घराविना रहाण्यासाठी अन्य निवारा वा छप्पर प्रतिवादी क्रं.२ हिला नाही. सरकारी योजनेचा लाभ घेण्यापासून प्रतिवादी क्रं. २ हिला प्रतिबंधित करण्याचा वादीचा खोडसाळ प्रयत्न आहे.

१५ ) वादी स्वत: स्लॅबची इमारत बांधल्याचे नमूद करतो व पडझड झालेल्या घराची दुरुस्ती प्रतिवादी क्रं. २ हिने करू नये अशी तूर्तातूर्त ताकीद मागतो. यावरून वादीचे हात, हेतू व विचार शुद्ध नाहीत व प्रामाणिक हेतूने वादी कोर्टात आलेला नाही, हे सिद्ध व उघड होते.

१६ ) वादी हा मुंबई येथे रहातो. वादी श्रीमंत आहे. त्याची इमारत स्लॅबची आहे असे वादीचे प्रतिपादन आहे उलट प्रतिवादी क्रं.२ हिचे पडझड झालेलं घर मातीचे आहे. ही वस्तुस्थिती पहाता व्यवहाराचा समतोल व प्रथमदर्शनी प्रतिवादी क्रं. २ हिचा पक्ष रस्त व विश्वसनीय आहे.

१७ ) प्रतिवादी क्रं.१ ते ३ यांनी कोणतीही भिंत पाडलेली नाही. परंतु गरीब प्रतिवादी क्रं. २ हिला कोणतीही शासकीय मदत मिळू नये व प्रतिवादी क्रं.२ या वृद्ध महिलेचा छळ व तिचे हाल होण्यासाठी कुटील हेतूने वादीने हा दावा दाखल केला असून स्वत:च्या अनैतिक हेतूंसाठी न्यायालयाचा वापर वादी करू पहात आहे व ही बाब अत्यंत गंभीर आहे. मे. कोर्टाची दिशाभूल करून वादीने एकतर्फा आदेश मिळवलेला



Scanned with OKEN Scanner

आहे.तो तातडीने रद्द होणे आवश्यक आहे. पावसाळा सुरु होणार असल्याने किंबहुना सुरु झाल्याने हा ताकीद आदेश रद्द करण्यात येणे न्यायपुर्ततेसाठी अत्यंत गरजेचे आहे.

१८ ) वादीने स्व:ताच्या मयत वडिलांचे नाव कमी करण्यासाठी ही प्रयत्न केले नाहीत. हे दाव्याच्या टायटल क्लऑज ( title clause ) वरुन ही दिसून येते. एवढा वादी कर्त्यव्यपूर्तीच्या बाबतीत निग्लीजंट (negligant )आहे. तसेच जून व सप्टेंबर २०२४ मध्ये जर गैरकृत्ये घडली तर त्याच वेळी दावा करून ताकीद अर्ज का केला नाही याबाबत अर्जात अवाक्षर नाही. त्यामुळे वादीच्या या अर्जास डीले व लॅचेसच्या तत्वाची बाधा आहे.

१९ ) न्यायाचा तूळ, प्रथम दर्शनीची रास्त व विश्वसनीय अशी बाजू वा केस ही प्रतिवादी क्रं. २ हिची आहे.

२० ) ग्रामपंचायत व शासकीय अधिकारी यांना पक्षकार न करता त्यांच्यावर आरोप करणारे खोडसाळ प्रतिपादन दाव्यात वादीने केले आहे. वादीच्या नोटिसांचा खोटेपणा उघड झाल्याने त्याना केराची टोपली दाखवण्यात आली हे सत्य आहे. प्रतिवादी क्रं.१ ते ३ यांनी वादीच्या कुठल्याही हक्कावर अतिक्रमण केले नाही वा वादीचे कोणतेही , कसलेही नुकसान केलेले नाही. वादीने सत्यस्थिती दडवून चुकीचा तपशील देणारा दावा दाखल करून त्यात हा खोडसाळ अर्ज दिला आहे. खोट्या व खोडसाळ तक्रारी वारंवार केल्या म्हणून खोटेपणाला खरेपणा वा वैधता प्राप्त होत नाही. त्यामुळे इक्विटीच्या तत्वावर आधारित ताकीदीची दाद वादीला मिळणारी नाही.

२१ ) सबब वादीचा तूर्तातूर्त ताकीद अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा , म्हणून दिले म्हणणे .

येणेप्रमाणे ताकीद अर्जावर म्हणणे आहे.

तारीख – २७/०५/२०२५

---------------------------------

श्री. प्रमोद तुकाराम गुरव

---------------------------------

श्री. प्रवीण तुकाराम गुरव

Scanned with OKEN Scanner

## प्रतिज्ञालेख

मी श्री. प्रविण तुकाराम गुरव व.सु. ४४ वर्षे, धंदा- जिम व्यवसाय , राहा मु. पो. नांदगाव , वाघाची वाडी.ता. कणकवली जि. सिंधुदुर्ग सध्या राहा. मु.पो. जानवली, आदर्शनगर ता. कणकवली जि. सिंधुदुर्ग सत्यप्रतिज्ञेवर शपथ घेऊन कथन करतो की, वर नमूद तूर्तातूर्त ताकीद अर्जावर म्हणण्यातील नमूद कलम १ ते २१ मधील नमूद सर्व मजकूर माझे स्वत:चे उत्तम माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केले प्रतिज्ञा. आज मुक्काम कणकवली

दिनांक - २७/०५/२०२५

श्री. प्रविण तुकाराम गुरव



Scanned with OKEN Scanner